महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

म्हाडा MHADA

सचिव/ प्रा. यांचे कार्यालय

कक्ष क्र. ५२३, चौथा मजला, गृहनिर्माण भवन , कलानगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१

**उपमुख्य अभियंता (गट-अ) (एस-२५) या संवर्गात तात्पुरत्या व स्थानापन्न स्वरुपात पदोन्नती.**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१**
**आदेश क्र.प्राधि./पदोन्नती/२०२६/8953335/प्र.७**
**दिनांक:-** 1 2 MAY 2026

**संदर्भ :-**
१. कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांचे आदेश क्र.पदस्था- २०२४/प्र.क्र.८६/गृनिभू दि.२५.०९.२०२५ रोजीचे आदेश.
२. प्राधिकरणाचे आदेश क्र. प्राधि/आदेश/पदोन्नती/२०२५/७०५९८२४/प्र.७. दि.०३.१०.२०२५
३. अवर सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे आदेश क्र.पदस्था- २०२५/प्र.क्र.८६/गृनिभू दि.०८.०४.२०२६ रोजीचे आदेश.

**आदेश -**

कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांच्या दि.२५.०९.२०२५ रोजीच्या संदर्भ १ वरील आदेशान्वये शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार प्राधिकरणाच्या दि.०३.१०.२०२५ रोजीच्या संदर्भ २ वरील आदेशानुसार म्हाडा प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील श्री. दिनेश महाजन, कार्यकारी अभियंता/झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण **(एस-२३)** यांची उपमुख्य अभियंता (गट-अ) **(एस-२५)** या संवर्गात पदोन्नती देऊन, त्यांना उपमुख्य अभियंता/पुर्व/मुंबई मंडळ या रिक्त असलेल्या पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आली होती.

तथापि, अवर सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या दि.०८.०४.२०२६ रोजीच्या संदर्भ ३ वरील आदेशान्वये शासनाच्या संदर्भ क्र.१ वरील आदेशामधील श्री. दिनेश महाजन कार्यकारी अभियंता/झो.पु.प्रा. यांच्या पदोन्नती आदेशामध्ये अंशत: बदल करुन पुढीलप्रमाणे सुधारीत पदस्थापना करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कार्यकारी अभियंत्याचे नाव | सध्याची पदस्थापना | उपमुख्य अभियंता या पदावरील पदोन्नतीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. दिनेश महाजन | कार्यकारी अभियंता/ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | प्रपत्र बढती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण |

याबाबत मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांनी प्रपत्र बढती पदोन्नती संदर्भात नियमानुसार आदेश निर्गमित करण्याबाबतच्या सुचना दिलेल्या आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम-४०, परिशिष्ट-२, अट क्र-१८ नुसार तदर्थ स्वरुपात प्रपत्र बढती (पदोन्नती) देण्यात येते. **सदर तरतूदीनुसार प्रपत्र बढतीचा कालावधी हा आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याचा**

**कालावधीकरीता असतो. त्यानंतर सदर अधिकाऱ्यांनी मुळ विभागात हजर होणे आवश्यक आहे अशी तरतूद आहे.**

सदर तरतूदीनुसार कार्यकारी अभियंता/ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण या विभागात प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेले श्री. दिनेश महाजन कार्यकारी अभियंता (गट-अ) यांना शासनाच्या संदर्भ क्र. ३ वरील आदेशानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण या विभागातील उपमुख्य अभियंता (गट-अ) या संवर्गात पदोन्नतीनंतरची पदस्थापना/नेमणूक करण्यात येत आहे.

श्री. दिनेश महाजन, यांनी या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर म्हाडा प्राधिकरणाच्या मूळ विभागात रुजू व्हावयाचे आहे.

उपरोक्त पदोन्नती ही सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ/प्रा. यांच्या मान्यतेने.**

1/5/2026

(प्रफुल्ल ठाकूर)
**सचिव/प्राधिकरण**

**प्रति,**
**श्री. दिनेश महाजन, कार्यकारी अभियंता/झो.पु.प्रा.**
**(मुख्य कार्यकारी अधिकारी/झो.पु.प्रा. यांच्यामार्फत)**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

१. मा. मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ
२. मुख्य अभियंता -१,२,३/प्रा.
३. सहमुख्य अधिकारी/मुंबई मंडळ
४. उपमुख्य अभियंता/पुर्व/मुंबई मंडळ

**प्रत,** मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
**प्रत,** मा. मुख्य कार्यकारी अधिकारी/झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण यांना माहितीसाठी सविनय सादर.
**प्रत,** सचिव/झो.पु.प्रा. यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
**प्रत,** मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्रा. यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.
**प्रत,** प्रशासकिय अधिकारी, १-२/प्रा./मुंबई मंडळ/झो.पु.प्रा. यांना माहितीसाठी.

**प्रत माहितीसाठी :-**

मा.उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक
अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना
अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, मुंबई
अध्यक्ष, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड एम्पलॉईज को ऑप क्रेडीट सोसायटी लि., मुंबई
**प्रत:** प्रशासन-६,९,१०,११,१२,१३,/प्रा.
**प्रत:** निवडनस्ती करीता.